भारताचे राजपत्र

सी.जी.डी.एल.अ-5062020-219745

असाधरण

भाग-दोन खंड-1

प्राधिकरणाद्वारे प्रकाशीत

संख्या-45 नवी दिल्ली, रविवार दिनांक 27 सप्टेंबर 2020/अश्विन 15, 1942 शके

या संपूर्ण भागास स्वतंत्र्यरित्या पृष्ठ क्रमांक देण्यांत आलेले आहेत. त्यायोगे ते स्वतंत्र संकलन म्हणून गणल्या जावू शकते.

**विधी व न्याय मंत्रालय**

**विधी विभाग**

नवी दिल्ली, रविवार दिनांक 27 सप्टेंबर 2020/अश्विन 15, 1942 शके

संसदेने पारीत केलेल्या खालील कायद्रयास भारताच्या राष्ट्रपतींनी दिनांक 24 सप्टेंबर 2020 रोजी स्विकृत केला असून तो याद्धारे सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिध्द करण्यांत येत आहे.

# शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) किंमती विषयक आश्वासन व शेती सेवा किंमत आश्वासन आणि शेत सेवा कायदा 2020

क्रमांक 20/2020

(दिनांक 24 सप्टेंबर 2020)

शेती करारांवरील राष्ट्रीय चौकटीची तरतूद करणारा हा कायदा असून यायोगे शेतक-यांना, कृषी व्यवसाय संस्था, घाऊक विक्रेते, प्रक्रिया करणारे, निर्यातदार किंवा शेतीविषयक सेवा आणि शेतीच्या भावी / येणा-या उत्पादनांच्या विक्रीसाठी मोठया विक्रेत्यांकडून गुंतवणुकव्दारा सक्षम केले जाईल आणि त्याव्दारे जोडलेल्या किंवा त्यायोगे संबंधित गोष्टींसाठी परस्पर मान्य केलेल्या मोबदल्याच्या किंमतीच्या चौकटीत योग्य आणि पारदर्शक पध्दतीने संरक्षण व सबलीकरण करण्यात येईल.

संसदेने पारीत केलेल्या खालील कायद्रयास भारताच्या राष्ट्रपतींनी दिनांक 24 सप्टेंबर 2020 रोजी स्विकृत केला असून तो याद्धारे सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिध्द करण्यांत येत आहे.

## **प्रकरण** -1 (Chapter-I)
## **प्रारंभिक** (Preliminary)

1. (1) या कायदाला शेतकरी (सबलीकरण आणि संरक्षण)किंमतीचे आश्वासन आणि शेत सेवा कायदा, 2020 चे करार असे म्हटले जाईल. **संक्षिप्त शिर्षक व प्रारंभ**

(2) हा कायदा दिनांक 5 जून 2020 पासून अंमलात येईल.

2. या कायदामध्ये, अन्यथा संदर्भ आवश्यक नसल्यास,

व्याख्या

क) 'शेती उत्पादनांमध्ये' समाविष्ट आहेत.

(i) खाद्यपदार्थ ज्यात – खाद्य तेलबिया व तेलासह धान्य – जसे गहू, तांदूळ किंवा इतर दाणेदार धान्ये, डाळी, भाज्या, फळे, कवची फळे, मसाले, ऊस आणि कुक्कुटपालन, वराहपालन, शेळीपालन, मत्स्यपालन आणि दुग्धजन्य पदार्थांचा मानवी वापरासाठी नैसर्गिक किंवा प्रक्रिया स्वरुपात समावेश;

(ii) ढेपेसह पशुखाद्य आणि इतर

(iii) पिंजलेला किंवा न पिंजलेला कच्चा कापूस

(iv) सरकी आणि कच्चा ताग

ख) "कृषी उत्पन्न बाजार समिती प्रांगण" म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समितीचा भौतिक परिसर जो कोणत्याही नावाने आणि कोणत्याही राज्य कायद्यांतर्गत शेतमालाचा व्यापार आणि नियमनासाठी प्रस्थापित केला आहे;

ग) "कंपनी" म्हणजे कंपनी कायदा, 2013 च्या कलम (2) च्या उपकलम 20 मध्ये परिभाषित केलेली कंपनी / व्यापारी मंडळ

घ) 'इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहाराचे व्यासपीठ' म्हणजे प्रत्यक्ष आणि ऑनलाईन खरेदि-विक्री करिता, शेतक-यांचे उत्पादनासाठी व्यापार व वाणिज्यीक व्यापाराचे संचालन करण्याकरिता उपलब्ध करुन दिलेले व्यासपीठ, जे इलेक्ट्रॉनिक यंत्रांद्वारे आणि इंटरनेटचा वापर करुन, ज्याठिकाणी असा प्रत्येक व्यवहार शेतक-यांच्या उत्पादनाचे वितरण/वाटपात होईल.

न) “शेती सेवा” ज्यात बियाणे, कडबा-कुटार, चारा, कृषी रसायने, यंत्रसामुग्री व तंत्रज्ञान, सल्ला, अरासायनिक शेतीविषयक माहिती यांचा समावेश होतो.

च) ‘शेतकरी’ म्हणजे असा व्यक्ति जो स्वतः किंवा भाडयाच्या मजूरांद्वारे किंवा कोणत्याही मार्गाने शेतातून उत्पन्न घेतो आणि यांत शेती उत्पादक संस्थांचा समावेश राहील.

छ) ‘शेती उत्पादक संघटना’ म्हणजे शेतक-यांची किंवा गट जो कोणत्याही नावाने ओळखला जाई.

(1) जो अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यांतर्गत नोंदणीकृत असेल, किंवा

(2) केंद्र किंवा राज्य शासनाच्या मदतीने कोणत्याही योजना अथवा कार्यक्रमाद्वारे पुरस्कृत,

ज) “शेती करार” म्हणजे शेतकरी आणि प्रायोजक किंवा शेतकरी आणि एखादा प्रयोजक आणि कोणताही तृतीय पक्ष यांच्यात शेतमाल खरेदी करण्यासाठी किंवा शेतकी सेवा देण्यास सहमत असलेला प्रायोजित अथवा पूर्वाधारित गुणवत्तेच्या आधारे कोणत्याही शेती उत्पादनाचे उत्पादन करण्यापूर्वी झालेला लेखी करार होय.

स्पष्टीकरण

या कलमाच्या उद्देशाने शेती करार या संज्ञेत हे समाविष्ट असू शकते.

i. व्यापार आणि वाणिज्य करार ज्यात उत्पादनाच्या वेळी शेतमालाची मालकी शेतक-याकडे राहील आणि वितरणाच्या वेळी मान्यताप्राप्त अटींनुसार उत्पादनाला त्याची किंमत मिळेल.

ii. उत्पादन करार जिथे प्रायोजक संपुर्ण किंवा अंशतः शेती सेवा पुरविण्यास आणि परिणामांची जोखीम स्विकारण्यास सहमत असतो आणि शेतक-याने दिलेल्या सेवेसाठी शेतक-याला मोबदला देण्यासही सहमत असतो.

iii. असे इतर करार किंवा वर दिलेल्या कराराचे संयोजन

झ) 'भागीदारी संस्था' म्हणजे भारतीय भागिदारी कायदा, 1932 च्या कलम (4) मध्ये परिभाषित केलेली संस्था.

ण) "दैवी आपत्ती" म्हणजे पूर, दुष्काळ, खराब हवामान, भूकंप, साथीच्या रोगाचा प्रादूर्भाव, किडा-किटक व अशा इतर अप्रिय बाहय घटना ज्या अटळ आहे आणि शेती करार प्रवेश करणा-या पक्षांच्या नियंत्रणापलीकडे आहे;

त) 'अधिसूचना' म्हणजे, केंद्र शासन किंवा राज्य शासनाने कार्यालयीन राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेली अधिसूचना आणि त्यामधील शब्दप्रयोग अधिसूचीत केलेले किंवा अधिसूचीत तसाच अन्वयार्थ असतील-

1) व्यक्ति यामध्ये –

अ) व्यक्ति ,

आ) भागीदारी संस्था,

इ) कंपनी,

ई) मर्यादित दायीत्व असलेली भागीदारी,

उ) सहकारी संस्था

ऊ) सोसायटी किंवा

ए) कोणतीही संघटना किंवा व्यक्तिंची अशी नोंदणीकृत संस्था ज्यास केंद्र किंवा राज्य शासनाच्या चालु असलेल्या कार्यक्रमासाठी मान्यता देण्यांत आली आहे.

थ) 'विहित'म्हणजे अध्यादेशांतर्गत तयार केलेल्या नियमांव्दारे विहित असलेले / केलेले

द) 'नोंदणी प्राधिकरण' म्हणजे कलम 12 अंतर्गत राज्य सरकारव्दारा अधिसूचीत केलेला प्रधिकरण

ध) 'प्रायोजक' म्हणजे शेत उत्पादन खरेदीसाठी शेतक-याशी करार करणारी व्यक्ती

प) 'राज्य' यात केंद्रशासित प्रदेशाचा समावेश आहे.

प्रकरण 2

शेती करार

शेती करार व कालावधी

3. 1) शेतकरी कोणत्याही उत्पादनाच्या संदर्भात शेतीचा लेखी करार करु शकतो आणि अशा करारात पुढील तरतुदी करता येतात.

अ) पुरवठयाचा वेळ, गुणवत्ता, श्रेणी, मानके, किंमती आणि इतर बाबींसह अशा उत्पादनांच्या पुरवठयासाठी अटी व शर्ती, आणि

ब) शेती सेवांच्या पुरवठयाशी संबंधित अटी

परंतु अशा प्रकारच्या शेतीविषयक सेवा पुरविण्यासाठी कायदेशीर आवश्यक्तांचे पालन करण्याची जबाबदारी पुरस्कर्ता किंवा शेती सेवा प्रदात्यावर असेल.

2) शेती मालाच्या कोणत्याही हक्काचे उल्लंघन करुन या कलमांतर्गत बटाईदारासोबत कोणताही शेती करार केला जाणार नाही.

स्पष्टीकरण –

या पोट कलमाच्या उद्देशाने बटाईदार या शब्दाचा अर्थ असा आहे की, जो औपचारिक किंवा अनौपचारिकरित्या पिकाचा निश्चित वाटा देणारा किंवा जमीन मालकास निश्चित रक्कम देण्यास सहमत असणारा किंवा शेत जमिनीवर शेती करणारा किंवा शेतीचे पालन करणारा व्यवसायी होय.

3) शेती कराराचा किमान कालावधी हा जसा ठरला त्याप्रमाणे किंवा एक पीक हंगाम किंवा पशुधनाचे एक उत्पादन चक्र असावा, आणि जो जास्तीत जास्त 5 वर्षांचा असेल.

परंतु, जर कोणत्याही शेतीच्या उत्पादनाचे चक्र दिर्घ असून त्याचा कालावधी 5 वर्षांच्या पुढे जात असेल तर अशा परिस्थितीत शेती कराराचा जास्तीत जास्त

कालावधी शेतकरी आणि प्रायोजकांव्दारे शेती करारात स्पष्टपणे नमुद करुन परस्पर निर्णय घेतला जावु शकतो.

4) शेतक-यांना लेखी शेती करारनामा सुलभ करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारला योग्य वाटेल त्या प्रमाणे आदर्श अशा शेती करारासोबत आवश्यक त्या मार्गदर्शक सुचनाही देऊ शकेल.

4. (1) शेती करारामध्ये शेती करणारे पक्ष कराराच्या कामगिरीची ओळख पाहून आणि आवश्यक अट म्हणून गुणवत्ता, श्रेणी आणि शेतीच्या उत्पादनांच्या मापदंडाचे पालन परस्पर स्वीकार्याने करतील.

गुणवत्ता, श्रेणी आणि शेतीच्या उत्पादनांच्या मापदंडाचे मानके

(2) उपकलम (1) च्या उद्देशाने पक्ष पुढील गुणवत्ता, दर्जा आणि मानके स्विकारु शकतात.

अ) जे कृषीविषयक पध्दती, कृषी हवामान आणि अशा इतर घटकांशी सुसंगत आहे, किंवा

ब) राज्य सरकार किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही संस्थेव्दारा तयार केलेल्या किंवा या हेतुने सरकारव्दारा अधिकृत केलेल्या कोणत्याही संस्थेव्दारे तयार केलेल्या शेती करारामध्ये अशा दर्जा आणि मानकांचा स्पष्टपणे उल्लेख असावा.

(3) किटकनाशकाच्या अवशेषांची गुणवत्ता, स्तर व दर्जा, अन्न सुरक्षा मानके, दर्जात्मक शेती पध्दती आणि कामगार व सामाजिक विकासाचे मानके देखील शेती करारामध्ये अवलंबिली जाऊ शकतात.

(4) शेती करारामध्ये करार करणा-या पक्ष्यांना अशी अट आवश्यक आहे की, परस्पर स्विकार्य गुणवत्ता, ग्रेड आणि मानके, लागवडीच्या किंवा संगोपनाच्या प्रक्रियेदरम्यान किंवा वितरणाच्या वेळी तृतीय पक्षाच्या पात्र सहाय्यकांव्दारे निःपक्षपातीपणा आणि न्यायीपणाने परिक्षण आणि प्रमाणित केले जावेत.

5. शेतीच्या उत्पादनांच्या खरेदीसाठी द्यावयाची किंमत कृषी करारातच निश्चित आणि नमूद केली जावू शकते आणि जर अशा किंमतीत फरक असल्यास स्पष्टपणे नमुद केले जाईल की,

शेतीच्या उत्पादनांच्या किंमती

अ) अशा उत्पादनांसाठी हमी किंमत द्यावी लागेल.

ब) शेतक-यांना दयायची उत्तम किंमत सुनिश्चित करण्यासाठी हमी भावापेक्षा अधिक किंवा अधिक रक्कमेच्या स्पष्ट किंमतीचा संदर्भ हा विशिष्ट कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रांगण किंवा इलेक्ट्रॉनिक व्यापार आणि व्यवहाराच्या प्रचलित किंमतीशिवाय व्यासपीठ किंवा इतर कोणत्याही स्थीरचिन्ह (बेंचमार्क) किंमतीशी जोडला जावू शकतो.

परंतु, अशी किंमत किंवा हमी किंमत किंवा अतिरिक्त रक्कम निश्चित करण्याची पध्दत शेती कराराशी जोडली जावी.

6. (1) जिथे शेती कराराअंतर्गत कोणत्याही शेतमालाचे वितरण होते तेथे –

शेतमालाची खरेदी व विक्री

अ) प्रायोजकांनी फार्म गेटवर घेतलेली रक्कम त्याने मान्य केलेल्या वेळेत घ्यावी.

ब) शेतक-याव्दारे प्रभावित वितरणास वेळेवर स्विकारण्याची सर्व तयारी झाली असल्याची खात्री करणे ही प्रायोजकाची जबाबदारी असेल.

(2) प्रायोजक कोणत्याही शेती उत्पादनाचा पुरवठा स्विकारण्यापूर्वीच करारात नमुद केलेल्या उत्पादनांची गुणवत्ता किंवा इतर कोणत्याही उत्पादनाची तपासणी केल्याचे समजले जाईल व त्याचा हक्क असणार नाही. वितरणाच्या वेळी किंवा त्यानंतर अशा उत्पादनांच्या स्वीकृतीपासून मागे येता येणार नाही.

(3) प्रायोजक –

अ) जिथे शेती करार बियाणे उत्पादनासंबंधित असेल तेथे वितरणाच्या वेळी मान्य झालेल्या रकमेच्या दोन तृतीयांश पेक्षा कमी नाही एवढी रक्कम आणि उर्वरीत रक्कम ही प्रमाणन झालेनंतर परंतू तीस दिवसांचे आंत अदा करावी लागेल.

ब) इतर प्रकरणांमध्ये शेतमालाचा स्विकार करतांना मान्यताप्राप्त रक्कमेची संपूर्ण भरपाई करुन विक्रीच्या तपशीलासह पावती निर्गमीत करावी.

(4) राज्य सरकार पोटकलम (3) अन्वये शेतक-याला प्रदान करण्याची पध्दती आणि रिती विहित करुन देवू शकते.

7. (1) या अध्यादेशांतर्गत कोणत्याही शेती उत्पादना संदर्भात शेतीचा करार केला असल्यास, अशा शेती उत्पादनास, कोणतेही नावाने अस्तित्वात असलेल्या राज्य अधिनियमापासून, जो विक्री नियमन व खरेदीच्या नियमानाच्या उद्देशाने स्थापन करण्यांत आलेला आहे, त्यामधून सुट देण्यांत येईल.

शेती उत्पादना संबंधी सुट

(2) आवश्यक वस्तु कायदा, 1955 किंवा त्या अंतर्गत जारी केलेल्या कोणत्याही नियंत्रण आदेशात किंवा अस्तित्वात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही शेतमालाच्या साठवणुकीबाबत या कायदाच्या तरतुदींच्या अनुषंगाने केलेल्या शेतमालाचे उत्पादनाच्या करारास कोणतेही बंधन लागु होणार नाही.

8. या उद्देशाने असा कोणताही करार मनाई आहे –

अ) शेतक-याची जमीन किंवा त्याचा परिसरच्या जागेची विक्री, भाडेपट्टी आणि तारण यामध्ये कोणतीही बदल किंवा

ब) शेतक-याच्या जमिनीवर किंवा त्याच्या आवारात स्थायी ढाचा तयार करणे किंवा त्याच्या जमिनीवर काहीही सुधारणा करणे, याबाबत शेतक-याच्या जागेवरची प्रायोजकाने केलेली संरचना काढून घेण्यास किंवा कोणत्याही स्थायी रचनेची उभारणी किंवा काही बदल करावयाचा असल्यास, जमीन तिच्या मुळ स्थितीत त्याच्या स्वखर्चाने परत आणून देईल ही अट प्रायोजकाने मान्य

केल्याशिवाय या कायदाच्या तरतुदींच्या अनुषंगाने केलेल्या शेतमालाचे उत्पादनाचा करार.

परंतु, प्रायोजकाने मान्य केल्यानुसार अशी संरचना मालकी कराराची समाप्ती झाल्यानंतरही काढून टाकली जात नसेल तर कराराची पूर्तता झााल्यानंती आणि कराराची मुदत संपल्यावरही त्याची मालकी शेतक-याकडेच असेल.

९. एखादा शेती करार शेतकरी किंवा प्रायोजक किंवा दोघांनाही पतपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी किंवा जोखीम कमी करण्यासाठी केंद्र किंवा राज्य सरकार किंवा कोणत्याही वित्तीय सेवा प्रदात्याच्या कोणत्याही योजनेअंतर्गत विमा मंडळ किंवा संचयन अभिलेखासोबत जोडला जावू शकतो

10. कायदात तरतूद प्रदान केल्याप्रमाणे शेती सेवा प्रदाता किंवा एकत्रीत असा शेती कराराचा एक पक्ष होवू शकतो आणि अशा परिस्थितीत या कृषी करारात अशा समुहक किंवा शेती सेवा प्रदात्याची भूमिका आणि सेवा स्पष्टपणे नमुद केल्या जातील.

स्पष्टीकरण –

(i) समुहक म्हणजे कृषी उत्पादक संघटनेसह अशी एखादी व्यक्ती जी शेतकरी आणि प्रायोजक यांच्यात मध्यस्थ म्हणुन काम करते आणि दोन्ही पक्षांसाठी शेतकरी आणि प्रायोजकांना एकत्रीत सेवा प्रदान करतो ;

(ii) शेती सेवा प्रदाता म्हणजे शेती सेवा देणारी कोणतीही व्यक्ती.

11. शेती करार झाल्यावर, अशा करारातील पक्ष, कोणत्याही वेळी परस्पर संमतीने, कोणत्याही उचित कारणासाठी अशा करारास बदलू किंवा संपुष्टात आणू शकतात.

12. (1) शेती कराराच्या इलेक्ट्रॉनिक नोंदणीसाठी एक सोयीस्कर चौकट उपलब्ध करुन देण्याची अधिसूचना राज्य सरकार नोंदणीकृत प्राधिकरणाला देवू शकते.

(2) नोंदणी प्राधिकरणाची राज्यघटना, रचना, अधिकार व कार्ये आणि नोंदणी कार्यपध्दती राज्य सरकारव्दारे विहित केलेली असेल.

## प्रकरण — 3

## विवादाबाबत समझोता

13.(1) प्रत्येक शेती करारामध्ये करारामधील पक्षांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेल्या सामंजस्य प्रक्रिया व समेट मंडळाची स्पष्टपणे पूर्तता करावी लागेल.

परंतु अशा समेट मंडळामधील पक्षांचे प्रतिनिधीत्व योग्य व संतुलित असावे.

(2) कोणत्याही शेती करारामध्ये उद्भवणारा वाद प्रथम शेती कराराच्या तरतुदीनुसार स्थापन झालेल्या समेट मंडळाकडे पाठविला जाईल आणि असे वाद मिटविण्यासाठी मंडळाकडून प्रयत्नांची शिकस्त केली जाईल.

(3) अशा कोणत्याही वादाच्या बाबत, समेट प्रक्रियेतून तोडगा निघत असेल तर त्या तोडग्याच्या व्दारे एक ज्ञापन तयार केले जावून त्याव्दारे अशा समेटाचे ज्ञापन तयार करुन त्यावर पक्ष स्वाक्षरी करतील आणि असा निघालेला तोडगा पक्षांना बंधनकारक असेल.

14. (1) कलम 13 च्या पोटकलम 1 नुसार आवश्यक असलेली समेटाची प्रक्रिया शेती करारांत अंतर्भूत नसेल किंवा शेती करारातील विहीत कलमातील बाबी पूर्ण करण्यास कोणताही पक्ष 30 दिवसांच्या आत आपला वाद मिटविण्यास अपयशी ठरतो तेव्हा असा कोणताही पक्ष शेती करारांतर्गत वाद सोडविण्यासाठी उप विभागीय प्राधिकरण म्हणून घोषीत केलेल्या उप विभागीय दंडाधिका-यांकडे संपर्क साधू शकतो.

(2) पोटकलम (1) अन्वये असा वाद तेव्हाच उप विभागीय प्राधिकरणापुढे येईल जेव्हा –

अ) शेती करारात समेट प्रक्रियेची तरतूद नसेल आणि वाद मिटविण्यासाठी समेट मंडळाची स्थापना केली नसेल,

ब) समेट प्रक्रियेव्दारा वाद मिटविण्यात पक्षांना अपयश आले असता तसा वाद मिळाल्याच्या तारखेपासून, पक्षांना सुनावणीची वाजवी संधी दिल्यानंतर संक्षिप्त पध्दतीने, तीस दिवसांच्या आत वादाचा निर्णय घ्यावा आणि वादामध्ये अंतर्भूत रक्कम वसूलीबाबत, दंडतसेच व्याज या बाबत योग्य तो आदेश पारीत करावा, जो खालील अटींच्या अधीन असेल –

i) जिथे प्रायोजक, शेतक-यास दिलेल्या रक्कमेची भरपाई करण्यात अपयशी ठरतात, तिथे हा दंड देय रक्कमेच्या दिडपट वाढू शकतो.

ii) जिथे शेती कराराच्या अटींनुसार आगाऊ रकमेचे प्रदान केल्यामुळे किंवा किंमतीच्या निविष्टिमुळे प्रायोजकाकडून मिळालेल्या रक्कमेच्या पुर्नप्राप्तीचा आदेश शेतक-यांविरुध्द असल्यास ती रक्कम प्रायोजकांनी केलेल्या वास्तविक खर्चापेक्षा जास्त नसेल.

iii) जिथे विवादातील शेती करार हा कायदाच्या तरतुदींचे उल्लंघन करत असेल किंवा जर शेतक-याला रक्कम सक्तीने आकारली असेल किंवा कसूर केला असेल तर शेतक-याविरुध्द कोणतेही आदेश दिले जाणार नाही.

(3) उपकलम (4) अंतर्गत अपील केल्याखेरीज उप विभागीय प्राधिकरणाने या कलमांतर्गत पाठविलेल्या प्रत्येक आदेशास नागरी प्रक्रिया संहिता, 1908 च्या आदेशानुसार दिवाणी न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे लागु करण्यात येईल.

(4) उप विभागीय प्राधिकरणाच्या आदेशामुळे व्यथीत झालेला कोणताही पक्ष तीस दिवसांच्या आत अपील प्राधिकरणाकडे ज्याचे अध्यक्ष जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांन नामनिर्देशीत केलेले अपर जिल्हाधिकारी असतील त्यांचेकडे ते आदेश निघाल्यापासून 30 दिवसाचे आंत अपील करु शकेल.

(5) अपील प्राधिकरण 30 दिवसांच्या आंत अपील निकाली काढेल.

(6) या कलमांतर्गत अपील प्राधिकरणाने जारी केलेल्या प्रत्येक आदेशास दिवाणी न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे सक्ती असेल आणि तो नागरी प्रक्रिया संहिता, 1908 च्या आदेशानुसार लागू केला जाईल.

(7) उप विभागीय प्राधिकरण किंवा अपील प्राधिकरणाव्दारे कोणत्याही आदेशानुसार देय रक्कम ही जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल केली जावू शकते.

(8) या कलमांतर्गत विवादांचा निर्णय घेताना उप विभागीय प्राधिकरण किंवा अपील प्राधिकरणास केंद्र सरकारने विहित केलेले शपथेवर पुरावा घेणे, साक्षीदारांचे उपस्थितीची सक्ती करणे, कागदपत्रे व भौतिक वस्तुंचा शोध घेणे व प्रस्तुत करणे या उद्देशाने दिवाणी कोर्टाचे सर्व अधिकार असतील.

(९) उप विभागीय प्राधिकरण आणि अपील प्राधिकरणासमोर अर्ज किंवा याचिका दाखल करण्याची पध्दत आणि कार्यपध्दती ही केंद्र सरकारने विहित केल्याप्रमाणेच असेल.

15. कलम (14) मध्ये काहीही समाविष्ट असले तरी, त्या कलमांतर्गत दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने थकीत रक्कमेची वसुली करण्यासाठी शेतक-याच्या शेती विषयी कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

**प्रकरण** -5

**संकीर्ण**

16. केंद्र शासन, या कायदातील तरतुदिंचे पालन करण्यासाठी काही सूचना, त्यांना योग्य वाटतील तेव्हा, या अधिनियमातील तरतुदींच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी राज्य शासनास देवू शकेल आणि राज्य शासनास त्याचे अनुपालन करावे लागेल.

17. या अध्यादेशांतर्गत स्थपित नोंदणी प्राधिकरण, उप विभागीय प्राधिकरण, आणि अपील प्राधिकरण अशी सर्व प्राधिकरणे भारतीय दंड संहितेच्यार कलम 21 अंतर्गत लोकसेवक म्हणून समजल्या जातील.

18. केंद्र शासन, राज्य शासन , नोंदणी प्राधिकरण, उप विभागीय प्राधिकरण, आणि अपील प्राधिकरण किंवा कोणत्याही व्यक्तिविरुध्द जो या कायदाद्वारे किंवा त्याअंतर्गत बनविण्यांत आलेल्या कोणत्याही नियमांचे पालन चांगल्या उद्येशाने करीत असेल किंवा करण्यांचे प्रयोजन असेल तर त्याचेवर वाद, अभियोग किंवा कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

19. या अध्यादेशाद्वारे उप विभागीय प्राधिकरण, किंवा अपील प्राधिकरण यांना बहाल केलेले अधिकारात त्यांनी सोडविलेल्या वादामध्ये कोणतेही दिवाणी न्यायालय वाद किंवा विवादा बध्दलचे कामकाज विचारार्थ स्विकारु शकणार नाही, आणि त्याबाबत कोणतीही निषेधाज्ञा, कोणतेही न्यायालय किंवा कोणतेही प्राधिकरण या अध्यादेशाद्वारे बहाल केलेल्या किंवा त्याअंतर्गत च्या नियमान्वये, देवू शकणार नाही.

दिवाणी न्यायालयाचे अधिकारास बाधा

20. या कायदाच्या कोणत्याही तरतूदी अंमलात येण्यापूर्वी राज्यात कोणताही कायदा व इतर कोणताही अस्तित्वात असलेल्या कायदांचा तसेच कोणत्याही लेखाचा प्रभाव अधिभावी अधिकार या कायदास असणार आहेत.

परंतू, हा अध्यादेश लागू होण्यापूर्वी शेतकी करार किंवा असा करार जो राज्यात तात्पुरता अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायदयांतर्गत किंवा त्याअंतर्गत अस्तित्वात असलेल्या कोणत्याही नियमांतर्गत झालेला असल्यास तो करार त्याचा कालावधी संपेपर्यंत वैध राहील.

21. रोखे बाजार आणि प्रतिभूती करार नियमन कायदा, 1956 अंतर्गत मान्यताप्राप्त समाशोधन मंडळ आणि त्याअंतर्गत होणारे व्यवहारावर या कायदाच्या कोणत्याही तरतूदींचा प्रभाव असणार नाही.

22. (1) केंद्र शासनास या कायदाच्या तरतुदी लागू करणेसाठी नियमतयार करण्याचे अधिकार राहतील.

नियम तयार करण्याचे केंद्र शासनाचे अधिकार

(2) विशेषतः आणि उपरनिर्दिष्ठकोणत्याही अधिकारास बाधा येणार नाही असे सर्व नियम तयार करण्याचे किंवा खालील बाबींकरिता जसे –

(अ) ज्या इतर प्रयोजनासाठी कलम 14 च्या उप कलम 8 अन्वये उप विभागीय प्राधिकरण, किंवा अपील प्राधिकरण यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार बहार केलेले आहेत,

(ब) कलम (8) च्या उपकलम (10) अंतर्गत उप विभागीय प्राधिकरण अथवा अपिल प्राधिकरण यांचेकडे याचिका किंवा अर्ज दाखल करावयाच्या कार्यपध्दती बाबत,

(क) विहीत किंवा ईतर कोणतीही बाब किंवा केंद्र शासनाने नियमांद्वारे केलेली तरतूद

(3) या कायदाद्वारे केंद्र शासनाने तयार केलेले सर्व नियम किंवा त्यानंतरही तयार केलेले नियम संसदेचे सत्र चालू असतांना, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर तीस दिवसाचे कालावधीत अधिवेशनाचे एका सत्रात किंवा सलगच्या दोन किंवा सत्रांमध्ये अधिवेशनाचे सत्र संपण्यापूर्वी किंवा लगतच्या सत्रमध्ये दोन्ही सभागृहाची मान्यता

मिळणे किंवा त्यामध्ये काही सुधारणा सूचविल्यास, त्याप्रमाणे नियम तयार करुन किंवा नियमांची आवश्यकता नाही असे दोन्ही सभागृहास वाटत असेल ती, या अंतर्गत तयार करण्यांत आलेल्या नियमांस दोन्ही सभागृहाचे मान्यतेनंतरच सुधारीत स्वरुपात लागू होतील. जर त्यामध्ये काही सुधारणा केल्या असतील किंवा त्याचे विलोपन केले असेल तर त्याच्या विधिग्राहयतेस कोणतीही बाधा येणार नाही .

23. (1) राज्य शासन, कार्यालयीन राजपत्राद्वारे, या कायदाच्या तरतूदी लागू करण्याकरिता नियम जारी करु शकेल.

(2) विशेषतः आणि उपरकिनर्दिष्ट अधिकार बाबत कोणताही पूर्वग्रह न ठेवता हे नियम सर्वांकरिता आणि खालील प्रयोजनाकरिता राहतील जसे –

अ. कलम 6 च्या उप कलम 4 अन्वये प्रदानाचा प्रकार व रित,

ब. कलम 12 च्या उप कलम 2 अन्वये नोंदणी प्राधिकरणाची घटना, रचना, अधिकार आणि कार्य तसेच नोंदणीची कार्यपध्दती,

क. राज्य शासनाने याबाबत तयार केलेले नियमातील तरतूद, त्याविषयीच्या कोणत्याही विहीत केलेल्या बाबी.

(3) या कायदा अंतर्गत राज्य शासनाने निर्धारीत केलेले सर्व नियम किंवा त्यानंतरही तयार होणारे नियम राज्य विधिमंडळाचे सभागृहासमोर, ज्याठिकाणी विधिमंडळाचे दोन सभागृह आहेत तेथे किंवा ज्याठिाणी एकच सभागृह आहे मांडणे आवश्यक आहे.

24. (1) या कायदाच्या तरतुदीच्या अंमलबजावणीस कोणतीही बाधा येत असल्यास, केंद्र शासन,अधिकृत राजपत्रात प्रसिध्द करुन कोणतीही तरतूद सुसंगत नाही म्हणून येणारी अडचण दूर करण्यासाठी लागू करु शकेल.

(2) या कलमांतर्गत तयार केलेले कोणतेही आदेश किंवा त्याअंतर्गत तयार केलेले / होणारे कोणतेही आदेश संसंदेचे सत्र सुरु होताच संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर ठेवण्याची तरतूद आहे.

25. (1) **शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) किंमती विषयक आश्वासन व शेती सेवा किंमत आश्वासन आणि शेत सेवा कायदा** 2020 याद्धारे निरसित ठरत आहे. निरसित आणि व्यावृत्ती

(2) अधिनियम निरसित करतेवेळी या मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, **शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) किंमती विषयक आश्वासन व शेती सेवा किंमत आश्वासन आणि शेत सेवा कायदा** 2020 त्या अधिनियमांतर्गत असलेल्या तरतुदीनुसार कोणतीही कार्यवाही केलेली असेल अथवा ती पूर्ण करण्यांत आली असेल तर या कायद्रयांतर्गत असलेल्या तत्सम तरतुदीनुसार ती पूर्ण करण्यांत आल्याचे समजण्यांत येईल.

डॉ. जी.नारायण राजु
सचिव, भारत सरकार.